**Estd 1962**
**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ३०/१०/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या. **आज दि.३० ऑक्टोबर २०२१ रोजी B.Sc./M.Sc. (Nano Science) Sem. 1 & 2 and B.Sc./M.Sc. (Nano Science and Tech.) Sem. 7 & 8 अशा एकुण ४ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले तसेच आजपर्यंत एकुण ५४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.**

शैक्षणिक वर्ष २०२१—२२ मधील ऑक्टोबर—नोव्हेंबर २०२१ च्या हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखा व परीक्षा शुल्काबाबतचे सविस्तर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे. त्याप्रमाणे संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य तसेच संचालक, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था यांनी कार्यवाही करावयाची आहे.

परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे —

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | | | महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करावयाच्या तारखा | | |
|---|---|---|---|---|---|
| विनाविलंब शुल्क (पर्यंत) | विलंब शुल्कासहित रु.५०/— (पर्यंत) | अतिविलंब शुल्कासहित रु.५० + 300/- (पर्यंत) | विनाविलंब शुल्क (पर्यंत) | विलंब शुल्कासहित रु.५०/— (पर्यंत) | अतिविलंब शुल्कासहित (पर्यंत) |
| दि.१२/११/२०२१ ते दि.२६/११/२०२१ | दि.२९/११/२०२१ ते दि.२/१२/२०२१ | दि.४/१२/२०२१ ते दि.७/१२/२०२१ | दि.२९/११/२०२१ | दि.४/१२/२०२१ | दि.९/१२/२०२१ |

तसेच कोविड—१९ मुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थी हितास्तव विद्यापीठ अधिकार मंडळाने परीक्षा शुल्क वाढीस शैक्षणिक वर्ष २०२१—२२ या एका वर्षासाठी स्थगिती देण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी दिली.